# प्रेम आणि पतन

कुठल्याशा जागी देख।
बिल्डिंग मोडकी एक। पसरली
चाळीत अशा वसणारी।
पोरगी कुणीशी होती। छबकडी।।
जाताना नटुनी थटुनी।
कुणि तरुण पाहि ती तरुणी। एकला।।
त्या क्षणी,
त्याचिया मनी,
तरंगति झणी,
गोड तरि जहरी। प्रीतीच्या नवथर लहरी। नकळता।।

तो ठसा मनावर बसला।
तो घाव जिव्हारी बसला। त्याचिया ।।
वेड पुरे लावी त्याला।
चाळीतिल चंचल बाला। बापडया ।।
अकलेचा बंधहि सुटला।
संबंध जगाशी तुटला। त्यापुढे ।।
आशाहि,
कोणती काही,
राहिली नाही,
सारखा जाळी। ध्यास त्यास तीन्ही काळी। एक तो ।।

ही त्याची स्थिति पाहुनिया,।
चाळीतिल सारी दुनिया। बडबडे ।।

इष्काचा जहरी प्याला।
नशिबाच्या ज्याच्या आला। हा असा ।।

धडपडत चाळिंतुनि फिरणे।
ते होते त्याचे जगणे। सारखे।।

लोकांना नकळत बघणे।
पिउनिया चहाला जगणे। गरमशा।।
पटत ना,
त्याचिया मना,
जगी जगपणा,
डाव तो टाकी। मनुजातुनि दगडची बाकी। राहतो. ।।

यापरी तपश्च्चर्या ती
किति झाली न तिला गणती। राहिली।।
सांगती हिताच्या गोष्टी।
हातात घेउनी काठी। लोक त्या।।

तो हसे जरा उपहसे।
मग सवेच वदला त्रासे। चिडुनिया।।
निष्प्रेम चिरंजीवन ते।
जगि दगडालाही मिळते। धिक् तया।।
निग्रहे,
वदुनि शब्द हे,
अधिक आग्रहे,
सोडिना चाळे। चाळीचे चढला माळे। तरुण तो।।

पोरगी आली मग तेथ।
जोडयांना धरुनि करांत। फाटक्या।।
धावली उताविळ होत।
जोडा झणि थोबाडात। मारिला।।
तिरमिरुनी खाली पडला।

परि पडता पडता हसला। एकदा।।
तो योग,
खरा हठयोग,
प्रीतिचा रोग,
लागला ज्याला। लागते पडावे त्याला। हे असे

अनन्त काणेकर
चान्दरात

प्रेम आणि मरण या कवितेचे काणेकरांनी केलेले हे सुंदर विडंबन आहे.
या प्रेमवीराचे आचरट चाळे आणि त्याचा आविर्भाव याचे निव्वळ हसू येते. लोकांनी त्याला काठी घेऊन "समजावणे", निव्वळ चहाच्या खुराकावर त्याचे जगणे हे वास्तवदर्शी वाटते. त्या "छबकडी"ने त्याला जोडयाने हाणणे आणि खाली पडतापडता त्याचे हसणे हा कळसाध्याय वाटतो.

असे प्रेमवीर आपण सर्वांनीच बरेच वेळा बघितले आहेत, आपले कॉलेजमधील काही मित्र या स्थितीत असतांना त्यांना "समजाविले" आहे. यापुढे त्यांची आठवण झाली की या कवितेचीदेखील आपल्याला आठवण येईल हे नक्की.

काणेकरांनी मूळ कवितेतील काही ओळी जशाच्या तशा वापरल्या आहेत परंतु त्या ह्या कवितेचाच स्वाभाविक भाग वाटाव्यात इतक्या चपखलपणे.

इतके सुन्दर विडंबन वाचताना मूळ कवितेची आठवण होत नाही आणि ह्या विडंबनाचा (आणि विडंबनकर्त्याचा) हेतू गडकरींचा उपमर्द करण्याचा नाही हे सहजपणे समजते. अगदी

निस्सीम गडकरीभक्तांनीसुद्धा ह्या कवितेची वाखाणणी केली यातच सगळं आलं की.

विडंबनकवितांना प्रसिद्धी मिळाली आचार्य अत्रे यांच्यामुळे. झेंडूची फुले १९२४ साली प्रसिद्ध झाला आणि त्यामधील पहिल्या काही कविता १९२२ साल्च्या आहेत.

काणेकरांनी ही कविता डिसेंबर १९२४ मध्ये लिहीली आहे. म्हणजेच काणेकरांच्या विड,बनांवर आचार्य अत्रे यांचा प्रभाव नव्हता हे लक्षात येते.

ह्या नर्मविनोदी स्वभावामुळेच काणेकर संपूर्ण आयुष्यभर अजातशत्रू म्हणून ओळखले गेले. त्यांनी अशी अनेक विडंबने लिहीली पण त्याला फारशी प्रसिद्धी मिळावी याबाबत आग्रह धरला नाही नाहीतर झेंडूच्या फुलांसारखे एक आणखी अजरामर पुस्तक वाचकांच्या पसंतीच्या यादीत आढळले असते.

**मन्दार**